# रत्नागिरी जिल्हयाच्या प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्याबाबत झालेल्या जनसुनावणीचे इतिवृत्त.

रत्नागिरी जिल्ह्याची प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यावरील (CZMPs) जनसुनावणी गुरुवार दि. १२ मार्च २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, रत्नागिरी येथे घेण्यात आली.

जाहीर जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. लक्ष्मीनारायण मिश्रा<br>जिल्हाधिकारी, रत्नागिरी. | - | अध्यक्ष |
| २. | श्री. रविंद्र आंधळे<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर<br>(म.प्र.नि. मंडळाचे प्रतिनिधी) | - | सदस्य |
| ३. | सौ. इंदिरा गायकवाड,<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,<br>रत्नागिरी. | - | समन्वयक |

जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

सुरवातीस सौ. इंदिरा गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी रत्नागिरी तथा जनसुनावणीच्या आयोजक यांनी जनसुनावणी प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने चालू केली. त्यांनी सांगितले की, केंद्रीय वने व पर्यावरण वातावरण बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १८ जानेवारी २०१९ रोजी नवीन सीआरझेड अधिसूचना जाहीर केलेली आहे. त्या अनुषंगाने नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट या संस्थेने रत्नागिरी जिल्ह्यातील किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा २०१९ तयार केलेले आहे व सर्व जनतेच्या सूचना व हरकतीसाठी आमंत्रीत करण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने दि. २२ जानेवारी २०२० रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले आहे. सदर जनसुनावणी बाबतची जाहीरात दि. १०.०२.२०२० रोजी "रत्नागिरी टाइम्स" व "तरुण भारत" या दोन दैनिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती.

यावेळी श्री. शरद बळीराम बोरकर, गाव वरवडे, जिल्हापरिषद माजी शिक्षण सभापती आणि रत्नागिरी जिल्हा भंडारी समाजचे जिल्हाध्यक्ष यांनी सांगितले की, रत्नागिरी हा संपूर्ण सागरी पट्टा मराठी भाषिकांचा आहे पण अधिसूचना ही हिंदी व इंग्रजीमध्ये आहेत, हे जर सिंधुदुर्गमध्ये मराठीमधून होण्यासाठी जनसुनावणी पुढे



Scanned with CamScanner

ढकलली व ती दिनांक २७.०३.२०२० रोजी होणार आहे, मग रत्नागिरीमधील जनसुनावणी का पुढे ढकलली नाही याचे उत्तर मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली तसेच ते हिंदी व इंग्रजीमध्ये असल्याने सर्वसामान्यांना कळणार नाही. कोणतीही अधिसूचना स्थानिक भाषेमध्ये प्रसिध्द करणे महत्वाचे आहे त्यामुळे माझ्या हरकतीची नोंद घ्यावी. तसेच आपण प्रारुप आराखडे पंचायतीकडे असतील असे म्हंटले आहे, ते आराखडे पंचायतीकडे प्राप्त झाले नाहीत, जे आम्ही बघीतले नाहीत त्यामुळे त्याचा अभ्यास केलेला नाही तर आता कसे सांगायचे? सौ गायकवाड यांनी सर्व मॅप्स वेबसाईटला टाकले आहे तेथे पहावे तसेच आपले म्हणणे नोंद केलेले आहे असे सांगितले.

सौ. गायकवाड यांनी सिंधुदुर्गची जनसुनावणी फक्त पुढे ढकलली आहे असे सांगून महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण, पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी यांना प्रस्तावित आराखडयाचे सादरीकरण करावे अशी विनंती केली.

यावेळी माहिती मराठीत नसल्यामुळे ही जनसुनावणी घ्यायचीच नाही असा पहिला मुद्दा आहे असे *श्री. बोरकर यांनी* सांगितले. श्री. बोरकर यांनी प्रारुप आराखडा हा अधिसूचनेप्रमाणे तयार केलेला आहे काय त्याबाबत माहिती द्यावी तसेच आमच्या कोकण किनारपट्टीला कितीही पूर आले, कितीही वादळे आली तरी आमच्या किनारपट्टीला धोका निर्माण झालेला नाही व हे नोंद करुन घ्यावे असे सांगितले.

मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी जनसुनावणीचे स्वरुप थोडक्यात सांगितले, या जनसुनावणीच्या अनुषंगाने ४२८ हरकती प्राप्त झालेल्या आहेत तसेच सादरीकरणामध्ये संबंधित विभागाचे अधिकारी माहिती सादर करतील, जनसुनावणी झाल्यानंतर तोंडी हरकती शांतपणे नोंदवाव्यात, त्याचे इतिवृत्त आपल्या हरकतीसह शासनाकडे पाठविले जाईल, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती याबाबत निर्णय घेत नाही असे सांगितले.

श्री. गजानन कमलाकर पाटील, पंचायत समिती सदस्य, गाव मालगुंड यांनी सांगितले की, आमच्या कोकणातील लोकांच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबत ज्या तीव्र भावना आहेत त्या आपण केंद्र शासनापर्यंत पोहोचवाव्यात अशी आमची सर्वांची इच्छा आहे. दुसरे म्हणजे जे राजपत्र आपण गुगल वर प्रसिध्द केले आहे ते फक्त इंग्रजी व हिंदीमधून दिलेले आहे, नियमाप्रमाणे जी स्थानिक बोली भाषा *आहे* त्याप्रमाणे ते मराठी भाषेमध्ये हवे ते का नाही केले त्याचे उत्तर प्रथम द्या.



Scanned with CamScanner

मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, हे राजपत्र केंद्र शासनाने प्रसिध्द केले असल्याने ते इंग्रजी व हिंदीमध्ये आहे, यावर श्री. पाटील यांनी ते कळत नाही असे सांगितले. मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी सादरीकरण मराठीमध्ये करतील त्यावेळी ज्या सूचना, हरकती असतील त्या सांगाव्यात असे सांगितले.

डॉ. विनय नातू, माजी आमदार यांनी सांगितले की, जनतेच्या हरकती, सूचनांना जेवढी प्रसिध्दी व्हायला पाहिजे होती तेवढी प्रसिध्दी प्रशासनाकडून झालेली नाही, तहसिलदार, नगरपंचांयतीनी ही जनसुनावणीची नोटीस त्यांच्या काचफलकामध्ये लावलेली होती, मी ग्रामपंचायतींमध्ये चौकशी केली तेव्हा कांही ग्रामपंचायतींमध्ये नोटीस लागलेली होती, ९ तालुक्यापैकी ८ तालुके किनारा क्षेत्राशी संबंधीत आहे, जसा समुद्र किनारा आहे तसा खाडी किनारासुध्दा सीआरझेड मध्ये येतो, त्यामुळे या जिल्हयातील ८ तालुके बाधीत होतात, सर्वापर्यंत नोटीस गेली नाही ही हरकत नोंद करुन घ्या. आपणाकडे आपत्ती व्यवस्थापनामध्ये जे फोन नंबर असतात त्यावर मेसेज करता आले असते, एक महिन्यापुर्वी जरी प्रसिध्दी केली तरी जनसुनावणीच्या चार दिवस अगोदर पुन्हा एकदा प्रसिध्दी करावी लागते तसेच आम्ही जे म्हणणे येथे मांडणार आहे त्याची तसेच लेखी पत्रांची नोंद घ्यावी. यावर मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, ज्या **४२८** लेखी हरकती आलेल्या आहेत त्या सगळ्या मी वाचून पाहिलेल्या आहेत. साधारणत: प्रत्येक गावातील प्रत्येक ग्रामपंचायतींच्या नागरिकांचे म्हणणे सारखेच आहे. त्यातील ९० टक्के लोकांची सीआरझेड लाईन २०० मिटर वरुन ५० मिटर करावी अशा सूचना आहेत व त्या सगळ्या गावांशी संबंधित आहे.

श्री. बोरकर यांनी सांगितले की, मला प्रश्न असा आहे की, सिंधुदुर्गमध्ये अधिसूचना मराठी भाषेत होईपर्यंत जनसुनावणी पुढे ढकलण्यात आलेली आहे, सिंधुदुर्ग ते वसई किनारपट्टी ही संपूर्ण मराठी भागातील आहे, कायद्यामध्ये १०० टक्के अशी तरतूद आहे की, स्थानिक भाषेमध्ये अधिसूचना वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली पाहिजे, आम्ही हिंदीमध्ये वाचले आहे पण सर्व शब्द आम्हाला कळू शकले नाही, हे जर मराठीमध्ये लिहीले असते तर त्याचा आम्हाला अभ्यास करता आला असता. आपण एकदा मराठीमध्ये सादरीकरण करुन आम्हाला समजणे शक्य नाही.

यावेळी अगोदर अधिसूचना मराठीमध्ये उपलब्ध करुन द्या व नंतर सदरची जाहीर जनसुनावणी घ्या अशी उपस्थितांकडून मागणी करण्यात आली.



Scanned with CamScanner

मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्यातील कोकण किनारपट्टीबाबतच्या काही जनसुनावणी झालेल्या आहेत व अजून काही होणार आहेत, सिंधुदुर्गची जनसुनावणी ही लोकप्रतिनिधींनी सध्या महाराष्ट्रामध्ये अधिवेशन सुरु आहे व ते संपल्यानंतर घ्या अशी मागणी केली होती व हे अधिवेशन संपल्यानंतर सिंधुदुर्गचीसुध्दा पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी होणार आहे. यावर श्री. बोरकर यांनी सांगितले की, मी याबाबत सिंधुदुर्गचे आमदारांशी स्वत: बोललो त्यावेळी त्यांनी अधिसूचना मराठीमध्ये करुन द्या, ते सर्व लोकांपर्यंत पाहोचू दे, लोकांना सर्व माहिती कळू दे आणि त्यानंतर जनसुनावणी घ्या अशी मागणी केल्याचे सांगितले आहे. मा. आमदार राणेसाहेब यांनीसुध्दा हा मुद्दा मांडला आहे, आम्ही कोकण किनारपट्टीमध्ये परंपरेने राहतो, आम्ही आध्यात्म व देव माननारी माणसे आहोत, ही भगवान परशुरामाची भूमी आहे, त्यामुळे आमच कधी वादळ-वारे, वाईट प्रसंग आलेले नाहीत, आम्ही भंडारी लोक छ. शिवाजी महाराज काळापासून किनारपट्टीचे संरक्षण करत आहोत, आम्ही मच्छीमार करणारे व कष्ट करणारे लोक आहोत आम्हाला हा त्रास का असा आमचा प्रश्न आहे. आम्हाला मराठीमधे अधिसूचना मिळाली पाहिजे, त्याचा अभ्यास झाला पाहिजे त्यानंतर जनसुनावणी घ्या.

श्री. तुषार उत्तम नागवेकर यांनी अधिसूचना स्थानिक भाषेमध्ये असली पाहिजे, मराठी ही येथील लोकांची बोलीभाषा आहे व ही भाषा संपूर्ण भारत देशामध्ये दोन क्रमांकाची भाषा मानली जाते अशा परिस्थितीत राज्य शासनाने पण दखल देणे गरजेचे आहे, जे अधिकार आपल्याकडे आहेत ते वापरले गेले नाहीत, तसेच स्क्रीनवर जे मराठीमध्ये दाखवले आहे त्याचा अर्थ सर्व उपस्थितांना ज्ञात होईल व त्याचा अर्थबोध होईल असे नाही.

मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, आपल्याला जो कुठला मुद्दा समजत नसेल तर संबंधित अधिकारी मराठीत सांगतील, सर्व शंकांचे निरसन मराठीतून केले जाईल असे सांगितले.

श्री. तुषार उत्तम नागवेकर यांनी आमची आकलन शक्ती एवढी प्रगल्भ नाही, माझे म्हणणे आहे की, जनसुनावणी पुन्हा लावण्यात यावी, आपण जे नकाशे तयार केलेले आहेत त्यावरील मार्कींग समजून येत नाही, असे सांगितले.

श्री. राजेश बेंडल, नगराध्यक्ष, गुहागर यांनी सांगितले की, आजच्या जनसुनावणीची मी नगराध्यक्ष असतानासुध्दा मला माहिती नाही, आम्हाला शेवटी शेवटी माहिती मिळाली. माहिती इंग्रजीमध्ये आहे.



Scanned with CamScanner

जनसुनावणी पुढे ढकलावी. सादरीकरण दाखवल्यानंतर लगेच आम्हाला काही कळणार नाही. प्रसिध्दी बरोबर झालेली नाही. असे सांगितले.

मा. श्री. लक्ष्मीनारायण मिश्रा, जिल्हाधिकारी तथा पर्यावरणविषयक जनसुनावणीचे अध्यक्ष यांनी आजची जनसुनावणी घेऊ त्यानंतर आपली मागणी पर्यावरण विभागाकडे पाठवून जनसुनावणीबाबत निर्णय घेता येईल असे सांगितले.

यानंतर श्री. खाडे, तज्ञ सदस्य यांनी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण यांनी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा २०१९ बाबत स्लाईड शोव्दारे सीआरझेड बाबत माहिती सादर केली. यामध्ये किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापनाची उद्दिष्ट्ये; किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिनियम २०१९, भरती रेषा, ओहोटी रेषा आणि पारिस्थितीकीय संवेदनशील क्षेत्र यांचे आरेखन; पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राचे सीआरझेड (१-अ) आरेखन; सीआरझेड (१-ब) आरेखन; सीआरझेड-३, सीआरझेड-४ अ व ब, किनारपट्टी नियमन क्षेत्र वर्गवारी (अधिसूचना, २०१९ नुसार); माहितीचे विविध स्त्रोत; किनारपट्टी नियमन क्षेत्र अंतर्गत महाराष्ट्र राज्यात येणारे जिल्हे; किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा रत्नागिरी; यातील ३४ शिट्स, भरती रेषाची लांबी व नगरपालिकांची संख्या, परिस्थितीकीय संवेदनशील क्षेत्र : संख्यात्मक वर्गीकरण इ. माहिती दिली.

श्री. बोरकर यांनी लोकसंख्या जर कमी असेल आणि ते आता प्रत्यक्ष परंपरेने तेथेच राहत असतील तर त्यांचे काय असे विचारले.

वरील सादरीकरणानंतर उपस्थितांकडून खालीलप्रमाणे आक्षेप व सूचना मांडण्यात आल्या.

**प्र. १. डॉ. विनय नातू, माजी आमदार.**

सर्वेक्षण झाले त्यावेळी गुहागर ग्रामपंचायत होती, त्यामुळे ग्रामीणमध्ये धरली गेली, तीची आज नगरपंचायत झाली व आता सर्व कायदे नगरपालिकेचे लागतात व सी.आर.झेड. मध्ये गेले तर ग्रामीणचे कायदे लागतात. त्यामुळे ते सीआरझेड-३ मधून सीआरझेड-२ मध्ये आणले पाहिजे कारण ती नगरपंचायत आहे. यावेळी डॉ. नातू यांनी लेखी निवेदन सादर केले. तसेच घर दुरुस्तीच्या परवानग्या स्थानिक प्राधिकरणामार्फत मिळणेबाबत विनंती केली.

**प्र. २. श्री. राजेश बेंडल, नगराध्यक्ष, गुहागर.**

मा. डॉ. विनय नातू, माजी आमदार यांनी जो मुद्दा मांडला तोच माझा मुद्दा आहे, गुहागर नगरपंचायत सीआरझेड-२ मध्ये नकाशावरदेखील समाविष्ट करावे असा मुद्दा उपस्थित केला.



Scanned with CamScanner

**प्र. ३. श्री. गजानन कमलाकर पाटील**

आपण आता जी माहिती सादर केली त्याबाबत माझा पहिला प्रश्न आहे की, आपण जो मॅप दाखवला तो २०११ च्या सर्व्हेनुसार केलेला आहे की २०१९ च्या सर्व्हेनुसार केलेला आहे?

**उत्तर:**

२०११ चे जे नोटीफिकेशन होते त्याच्यानुसार नकाशे तयार करण्यात आले होते, त्याच्यामध्ये सीआरझेड-१ चे क्षेत्र, सीआरझेड २, ३ व ४ चे क्षेत्र त्या प्रमाणे ते मंजूर आहे. आता २०१९ मध्ये नवीन अधिसूचना आलेली असून त्यानुसार सीआरझेड-३ चे क्षेत्र आहे आणि खाडीचे क्षेत्र आहे त्यामध्ये १०० मिटरचे ५० मिटर करण्यात आले. तो बदल आणि ना विकास क्षेत्राचा जो बदल आहे २०० मिटर वरुन ५० मिटर सी.आर. झेड ३ अ व ब हा बदल नकाशामध्ये करण्यात आलेला आहे.

**प्र. ४. श्री. गजानन कमलाकर पाटील**

चेन्नईच्या संस्थेला हे काम दिले आहे, २०१९ चा जो सर्व्हे झाला त्याप्रमाणे नवीन मॅप त्यांनी अद्याप सादर केलेला नाही, त्यामुळे त्याच्यातून काही बोध होत नाही, त्यांनी आता सांगितले की, नो डेव्हलपमेंट झोन हा हाय टाईड लाईन पासून २०० मिटर होता त्याच्यामध्ये नेमके कशास मनाई केलेली आहे. याचा बोध होत नाही. कोकणामध्ये खासकरुन रत्नागिरीमध्ये आपण पर्यटन वाढवायचे म्हणतो, शासन चांगला प्रयत्न करत आहे पण ना विकास क्षेत्रामध्ये त्यांनी नेमकी कशास मनाई केलेली आहे त्याचा काहीही खुलासा त्यांनी केलेला नाही. मच्छीमारांसाठी काही ठिकाणी त्यांनी सवलती दिलेल्या आहेत असे ते म्हणताहेत, ५० मिटरवर आणावे असे ते म्हणताहेत पण मॅप बघा आजही २०० मिटरच्या मॅपमध्ये कुठले कुठले सर्वे नंबर जाताहेत त्याचा उल्लेख करुन त्यांनी सांगितले आहे म्हणजे उद्या शासनाकडे आम्ही कुठल्या परवानग्या घ्यायला येऊ त्यावेळी तुम्ही तो सर्व्हे नंबर नकाशामध्ये बघून परवानगी नाकारणार त्यामुळे २०११ चा सर्व्हेप्रमाणे यांनी केलेले पुर्णपणे चुकीचे आहे. २०११ च्या सर्व्हेनुसार त्यांनी प्लॅन बनविले आहेत, २०११ ची लोकसंख्या ग्रहीत धरलेली आहे. आताच्या लोकसंख्येनुसार ते व्हायला पाहिजे होते पण तसे झालेले नाही. वरवड्यामध्ये खारवीवाडा म्हणून एक गाव आहे, संपूर्ण मच्छीमार समाज, खारवी समाजाचा हा गाव आहे. फार मोठी लोकसंख्या आहे. आपण जर हा नकाशा पाहिला तर संपूर्ण २३५ एकरचा गाव आहे याच्या



Scanned with CamScanner

चारही बाजूने लाल पट्टा व सर्व्हे नंबर टाकलेला आहे, या लोकांनी करायचे काय, २३५ मधील २७ एकर सोडून बाकी सर्व ना विकास क्षेत्रामध्ये गेले आहे. माझा मुद्दा असा आहे की, आपण पर्यटन वाढणार, जर ना विकास क्षेत्र केले तर पर्यटनावर अवलंबून असणारे कुठेलेही उद्योगधंदे तेथे होणार नाहीत. मराठी या आमच्या बोलीभाषेमध्ये आम्हाला जर माहिती उपलब्ध करुन दिली असती तर आम्ही अधिक चांगला अभ्यास करुन त्यावर बोललो असतो पण ते झालेले नाही. कुठल्याही प्रकारचा विकास त्या ठिकाणी झाला नाही पाहिजे असे ज्यावेळी ते म्हणतात त्यावेळी नेमकी कशाला मनाई केलेली आहे हे सांगितले नाही. वरवडे येथे कुठल्याही प्रकारचा विकास होणार नाही. त्यामुळे आमची कळकळीची विनंती आहे की आपण केंद्र सरकारला आमच्या भावना कळवाव्या व आम्हाला ना विकास क्षेत्र पूर्णपणे वगळून मिळावे.

**प्र. ५. श्री. दिपक विचारे, दापोली, जि. रत्नागिरी.**

वरील प्रश्नाला जोडून एक विषय आहे की, जे एरिअल डिस्टंस घेतले आहे त्याच्यामध्ये रत्नागिरी जिल्हयासाठी एलिवेशनल आस्पेक्ट विचारात घेतला नाही? त्याच्यामुळे हाय टाईड लाईन ज्या डिमार्क झालेल्या आहेत त्या काही ठिकाणी दिड ते दोन किलोमिटर लांब गेलेल्या आहेत. हा एलिवेशनल आस्पेक्ट रत्नागिरी जिल्हयासाठी अतिशय महत्वाचा आहे, त्यामुळे आपणाला विकासासाठी अडचणी निश्चितपणे येणार आहेत आणि आता जसे सांगितले की, २०० मिटरच्या बाहेरच्या कामांना परवानगी आहे त्याचा खुलासा होणे गरजेचे आहे. तसेच त्याच्या परवानग्या द्यायचा अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना आहे का त्यासाठी आम्हाला दिल्लीत जावे लागणार आहे याचा खुलासा करणे गरजेचे आहे. जर जिल्हाधिकारी यांचेकडे असेल तर आम्हाला काय परमिसीबल आहे. लोकसंख्येची जी अट आहे त्याप्रमाणे अख्ख्या कोकणचा जर विचार केला तर (कुठल्याही ग्रामपंचायतीचा मासेमारी गाव सोडून) एकाही गावाची लोकसंख्या २१६१ पेक्षा जास्त नाही व हा जर निकष असेल तर २१६१ पेक्षा कमी लोकसंख्या ही एक मोठी अडचण कोकणच्या विकासासाठी राहणार आहे, हा निकष जिथे टूरिजम व्हिलेज आहे. जिथे फ्लोटींग पॉप्युलेशन आहे, जिथे एम.टी.डी.सी. ने मंजूर केलेले सी क्लास टूरिजम नोटीफाईड व्हिलेजेस आहेत त्यांना लोकसंख्या कमी जरी असली तरी फलोटींग लोकसंख्या विचारात घेऊन तिथे ५० मिटर पर्यंत शिथील करावे अशी माझी विनंती आहे.



Scanned with CamScanner

उत्तर :

मा. अध्यक्षांनी आपण लेखी स्वरुपात द्यावे असे सांगितले.

प्र.६. ॲड. तुषार नार्वेकर.

रत्नागिरीची भौगोलिक परिस्थिती बघता प्रत्येक खेड्यामध्ये कायद्याने अपेक्षीत आहे एवढी लोकसंख्या नाही. सध्या आपण त्या संख्या निश्चित करु शकत नाही. कमी लोकसंख्या असलेल्या माणसांचे उद्योग हे या गोष्टीशी संबंधित आहेत. उद्या जर याचे कायद्यात रुपांतर झाले, ना विकास क्षेत्र आहे तो जर निश्चित झाला तर येणारे दिवस शासनाकडून कुठलीही परवानगी मिळणार नाही कारण आपण मॅपमध्ये बघून परवानगी नाकारणार मा. जिल्हाधिकारी यांना अधिकार असतील तर ते कुठल्या स्वरुपात असतील ते सांगावे. सादरीकरण करताना हे नकाशे २०११ च्या सर्व्हेनूसार केलेले आहेत असे सांगण्यात आले. जुवे, आंबेशेत या मॅपमध्ये जी लो टाईड आहे ती हाय टाईडच्या आतमध्ये दाखवण्यात आलेली आहे हा एक विनोद आहे. भविष्यामध्ये हे जर कायम झाल्यास जिल्हाधिकारी यांच्यावर जबाबदारी येणार आहे. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत एक हरकतीचे पत्र शासनाला द्यावे.

उत्तर -

मा. अध्यक्षांनी यामध्ये पर्यावरण विभागाकडून या संदर्भात बदल केले जातील असे सांगितले.

प्र.७. श्री. दिपक विचारे.

एम.टी.डी.सी. ने मंजूर केलेले सी क्लास टूरिजम नोटीफाईड जी गावे आहेत त्यांचा बदलणा-या लोकसंख्या नुसार तेथे राहणा-या लोकांचा विचार केला तर त्याच्यामध्ये आपल्याला सीआरझेड-२ प्रमाणे लँडवर्ड व सीवर्ड असा निकष लावला तर त्याच्यामध्ये आपल्याला नोटीफाईड रोडच्या म्हणजे एमडीआर इ. रोडच्या बॅकवर्ड साईडला जर आपल्याला परवानग्या मिळाल्या त्यामध्ये आपल्याला टुरिझम हा खूप वाढू शकतो व यामध्ये निर्णय मा. जिल्हाधिकारी यांच्या हातामध्ये राहील. आपण हा मुद्दा शासनाकडे ठामपणे पोहोचवावा. तसेच जी सध्या अस्तित्वात असलेली खेडी आहेत जे पिढ्यानपिढ्या तेथे राहत आहेत त्यांना नैसर्गीक वाढीसाठी घरे बांधावयाची असतील तेथे एन.ए. ऑर्डर मिळत नाही कारण ते सीआरझेड मध्ये येतात. एन.ए. ऑर्डर नाही मिळाली तर बँकेतून कर्ज



Scanned with CamScanner

मिळत नाही. यावर आपल्याला एक ठोस ऊपाय करावा लागेल. ग्रामीण शेतक-यांना तेथे घर बांधायला परवानगी मिळत नाही.

**प्र. ८. श्री. रुपेंद्र शिवलकर, भंडारी समाज रत्नागिरी, अध्यक्ष.**

मी निवेदन दिलेले आहे. जनगणना २०११ च्या लोकसंख्येनुसार ३ ए व ३ बी असे आपण लोकसंखेच्या आधारे केल्याप्रमाणे एक गाव जर ३ ते ४ किमी असेल, त्यातील एका किलोमिटरला २१६१ पेक्षा अधिक लोकसंख्या असेल त्याचा पुढच्या किलोमिटरला कमी असेल तर कसा काय निकष लावणार. दुसरी गोष्ट ज्यावेळी सुनामी आली त्यावेळी रत्नागिरी जिल्याच्या समुद्र किना-याचे पाणी वाढले त्यात कुठेही नुकसान झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे हा मुद्दा लक्षात घ्यावा. तिसरी गोष्ट रत्नागिरी मध्ये काळबादेवी हे गाव आहे, मागील बाजूला समुद्र आहे व पुढील बाजूला खाडी आहे, अशावेळी लोकवस्तीने काय करावे असा प्रश्न आहे.

**प्र. ९. श्री. शरद बळीराम बोरकर.**

मी वरवडे गावचा रहिवासी आहे, या गावाची किनारपट्टीची लोकसंख्या प्रत्यक्ष मोजली आहे काय, वरवडेमध्ये मच्छी विक्री केंद्र आहे, मंदीर आहे, स्मशानभूमी आहे, जेटी आहे आणि मेरिटाईम बोर्डाचे १९१४ चे तिवरे बंदर आहे, नकाशा बनवताना तो ना विकास क्षेत्र म्हणून कसे काय दाखवता.

**उत्तर:**

मा. अध्यक्षांनी सांगितले की, आपल्या सुचनानुसार आम्ही ॲनालिसीस करु, आपल्याशी संवाद साधून चर्चा करणे यासाठी आजची जनसुनावणी आयोजित केलेली आहे व मराठीमध्ये सर्व माहिती उपलब्ध करुन देऊ.

**प्र. १०. डॉ. विनय नातू :**

० ते ५०० मीटरमध्ये जी जागा आहे त्या जमिन मालकाची जवळजवळ निम्मी जागा ही ना विकास क्षेत्रामध्ये जाते, ० ते २०० पर्यंत काही करता येत नाही, फक्त नगरपालिका क्षेत्रामध्ये लोकसंख्या जास्त आहे, रत्नागिरी आणि गुहागर या दोन नगरपालिका तसेच चिपळूण खाडी किनारी आहेत. आमची मागणी आहे की हे क्षेत्र सीआरझेड-३ ऐवजी सीआरझेड-२ मध्ये समाविष्ट करावे त्यामुळे आम्ही जे मुद्दे मांडत आहोत त्यातील निम्मे मुद्दे सुटतील. त्यामुळे आम्ही उद्योग



Scanned with CamScanner

व्यवसायासाठी पात्र होऊ शकतो. ज्या दुरुस्तीच्या परवानग्या आहेत त्या जिल्हा प्रशासनाकडे असाव्यात, आमचे उद्योग द्या अशी आमची मागणी आहे.

यावर मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांनी ज्या बाकीच्या जुन्या नगरपालिका आहेत त्या सीआरझेड-२ मध्ये समाविष्ट केलेल्या आहेत असे सांगितले.

**प्र. ११. श्री. अमित कामत, प्रो.प्रा. कामत अ‍ॅण्ड असोसिएट्स :-**

माझी अशी मागणी आहे की, नव्या नोटिफिकेशनमध्ये अशी तरतूद आहे की, आपल्या भागाचा टूरिस्ट प्लॅन तयार करणे आवश्यक आहे. टेम्परारी फॅसिलीटी करिता टुरिझम स्पॉट सीआरझेड नकाशावर सुपर इम्पोज दयावेत जेणेकरुन पर्यटनामध्ये वाढ होईल.

यावेळी श्री. विचारे यांनी सांगितले की, आपण ज्यावेळी नगरपालिकांचा डी.पी. तयार करतो त्यामध्ये ५० मिटरचा मुद्दा हायलाईट केला तर हा मुद्दा लगेच निकालात निघेल.

**प्र. १२. नगराध्यक्ष, गुहागर.**

स्मशानभुमी विकसित करणेबाबत सीआरझेड नियमांची बाधा येत नाही.

**प्र. १३. मा. अलजी, सरपंच, गाव कुरधुंडा (संगमेश्वर तालुका).**

मी सीआरझेड व हायवे मध्ये येत आहे. नावडी ते तळेकांटे हा जो पट्टा आहे तसेच कुठल्याही गावची लोकसंख्या २१६१ मिळणार नाही, आम्हाला हायवे पासून ७५ मिटरमध्ये कुठलेही बांधकाम करता येत नाही, हाय टाईड पासून २०० मिटर पर्यंत आम्हाला कुठलीही बांधकाम परवानगी मिळत नाही, उर्वरित डोंगराळ भाग आहे, आमच्या पट्ट्यामध्ये एन.ए. करता येत नाही, कुठलाही उद्योग करता येत नाही, त्यामध्ये शिथीलता मिळावी.

**प्र. १४. अ‍ॅड. तुषार नार्वेकर.**

वरवडे खारवीवाडा येथे एका कंपनीने जागा खरेदी केलेली आहे. **त्याच्यामध्ये हाय टाईड** पासून ६५ मिटर ऊंची आहे, तेथील एकूण २३५ एकूर पैकी फक्त २७ एकर भाग सुटतोय. एका ठिकाणी शासन म्हणते पर्यटन वृध्दींगत व्हावे, व दुसरीकडे ना विकास झोन केलेला आहे. सामान्य माणूस परवानगीसाठी केंद्र शासनाकडे जाऊ शकत नाही.



Scanned with CamScanner

**प्र. १५. श्री. शरद बळीराम बोरकर, गाव वरवडे.**

३ मार्च २०२० रोजी विधानसभेमध्ये सन्माननीय आमदार निलेश राणे यांनी कोकण किनारपट्टी एम.टी.डी.सी. कडे न ठेवता त्याची वेगळी यंत्रणा निर्माण करावी असा ठराव मंजूर करुन घेतलेला आहे. तसेच आराखड्यामध्ये जयगडचे क-हाटेश्वर मंदीर जे समुद्रात आहे त्याची नोंद कशीकाय घेता येईल? अशी अनेक उदाहरणे आहेत याबाबत त्यांनी मत मांडले तसेच मा. भास्करराव जाधव यांनी मुद्दे मांडले आहेत.

**प्र. १६. श्री. शांताराम लक्ष्मण ऊर्फ आप्पा वांदरकर.**

भाटीमि-या, जाकिमि-या व सडामि-या ही तीन गावे येथून ३ ते ४ किलोमिटर अंतरावर आहेत. त्यांच्या पुढील बाजूस खाडी व मागील बाजूस समुद्र आहे. मधले अंतर २०० मिटरसुध्दा नाही. काही ठिकाणी समुद्र आणि खाडी यामध्ये ५० मिटर अंतर आहे. आणि पांढरा समुद्रपासून बघितले तर अत्यंत धोकादायक परिस्थिती आहे. त्यांनी २०११ मध्ये अभ्यास केलेला आहे त्यानंतर रत्नागिरीमध्ये झालेले प्रकल्प, मिरकरवाडा टप्पा क्र. २, सन २०१६-१७ मध्ये एशियन बँकेने १६ कोटी रुपये देऊन ७० टन वाळूच्या बॅग भरल्या त्याचे ४० वर्षे आयुष्य होते पण ते चार महिन्यातच लो टाईडला तरंगताना दिसतात. जर त्याठिकाणी घर बांधायचे झाले तर किंवा मि-या वासियांना त्याठिकाणी आता कुठेही परवानगी मिळणार नाही. त्याठिकाणी ७५० ते ८०० लोकांची वस्ती आहे. शासनाने बंधा-यासाठी टेक्नीकल सँक्शन दिले. तो बंधारा होण्यासाठी आज सीआरझेड आडवे येते. आज तुम्हाला मि-या आणि जिंदाल दोन उदाहरणे देतो. आज तुम्ही जिंदाल बघीतले तर तेथे मच्छिमार क्षेत्र होते तेथे समंद्रात हजारो एकरवर भर टाकून जिंदालने जमिन तयार केली ती कुठे अडचण आली नाही, त्यांना परवानग्या कशा मिळतात. मि-या बंदर जनतेच्या संरक्षणासाठी बांधलेला आहे. याबाबत जानेवारी २०१९ ला आम्ही अडीच ते तीन हजार लोकांनी मोर्चा काढला, आणि आमच्यावरच केसेस झाल्या. त्या अजून काढल्या नाहीत. या किनारपट्टीवरील लोकांनी कुठे जायचे, कोणाकडे दाद मागायची. यामध्ये कुठलाही लोक प्रतिनिधी आम्हाला साथ देत नाही. पालकमंत्र्यांची गाडी अडविली त्यावेळी दखल घेतली गेली. सीआरझेड आमच्या मानगुटीवर बसविलेले आहे. आज आमच्या अंगणामध्ये समुद्राचे पाणी आहे याचा यांनी अभ्यास करायला पाहिजे. चेन्नईच्या लोकांनी १६ कोटी रुपये पाण्यात घालवले. आम्ही सगळयांनी त्याला विरोध केला होता. आम्हाला सांगितले ते एशियन



Scanned with CamScanner

डेव्हलपमेंट बँकेची स्कीम आहे त्याला विरोध करु नका. बंधा-याचे प्रप्रोजल मंत्रालयामध्ये प्रलंबीत आहे. रत्नागिरी पतन अभियंता कांहीही लक्ष देत नाहीत, चुकीची कामे करतात.

**प्र.१७. श्री. राजीव कीर**

मी मांडवी परिसर पर्यटन संस्थेच्या वतीने आपणांस निवेदन दिलेले आहे. हा संपूर्ण जिल्हा किनारपट्टीवर वसलेला आहे. एक काळी या किनारपट्टीवर सोन्याचा धूर निघत होता. रत्नागिरी शहरामध्ये जे कॉंग्रेसभवन आहे मुरलीधर मंदीर त्याठिकाणी गलबते लागत होतो आणि आणि व्यापार चालू होता. हा व्यापार बुडाल्यामुळे आज ही अवस्था आहे. सी आर झेडमुळे १९०५ सालापासून ज्यांची मातीची, गवताची घरे आहेत ती अनेक वादळवारे आले, त्सुनामी सारखी वादळे आली तरी ती आजही टिकून आहेत. निसर्गाने कोणतीही अवकृपा या किनारपट्टीवरील लोकांनी केलेली नाही. जी अवकृपा आहे ती शासन निर्मित आहे. चुकीच्या पध्दतीने ब्रेक वॉटर वाढ झालेली आहे, चुकीच्या पध्दतीने मिरकरवाडा टप्पा २ वर काम केलेले आहे आणि म्हणूनच समुद्र मि-या गाव गिळंकृत करत आहे. हे सरकार निर्मित आहे. काळबादेवी येथे एका बाजुला समुद्र आणि एका बाजूला खाडी किनारा आणि मधले अंतर दिडशे ते पावणे दोनशे मिटर आहे. सीआरझेड चा नवीन कायदा आला तर ते लोक राहणार कुठे, आतापर्यंत २५ वेळा हा कायदा आणला गेला त्यामध्ये सुधारणा केली. गोरगरिबांना उध्वस्त करु नये, त्यांना जुने घर नव्याने बांधायचे असेल तर त्यासाठी परवानगी घेण्याची अट लावू नये.

**प्र. १८. श्री. सचिन तोडणकर, कर्दे, दापोली सरपंच, नागरेगाव.**

आमचा आक्षेप असा आहे की, सीआरझेड- ३ ए मध्ये जो २१६१ लोकसंख्येचा निकष ठेवलेला आहे तो क वर्ग पर्यटन आहे त्या गावांना शिथील करावा.

**प्र. १९. स्वत:चे नांव न सांगता प्रश्न उपस्थित केला.**

खाडीचे पाणी आमच्या गावामध्ये येते, आमचे गावाच्या एका बाजुला खाडी आहे व एका बाजुला डोंगर आहे. ५०० मिटरसुध्दा रुंद नाही, हाय टाईड लाईन राजापूर पर्यंत ३० किमी आहे ती आपण धरणार काय.

यावर मा. जिल्हाधिकारी यांनी त्याचा मॅप बघून निर्णय घेतला जाईल असे सांगितले.



Scanned with CamScanner

**प्र. २०. श्री. संतोष बोरकर, गाव वरवडे भंडारवाडा.**

ना विकास क्षेत्र या नवीन कायद्याचा स्थानिक तरुणांना मोठा धक्का बसलेला आहे. बेरोजगारी असल्याने पर्यटनदृष्टीने आपणांस काहीतरी व्यवसाय करता यावा म्हणून तरुण धडपडत आहे, परंतु वरवडे भंडारवाडा याच्या पाठीमागील बाजूस समुद्र, दोन्ही बाजुला खाडी, व पुढे कांदळवन पट्टा जाहीर केलेला आहे यामुळे तरुणांना व्यवसाय करता येणार नाही त्याबाबत आपण विचार करावा.

**प्र. २१. श्री. शिवलकर, भाटीमि-या.**

सीआरझेड हा पहिला १९९० मध्ये आला आणि सर्वे २०११ मध्ये केलेला आहे. परंतु सीआरझेडचे उल्लंघन शासनानेच केले आहे. कारण कोर्टाची बिल्डींग सीआरझेड मध्ये येते, ते आपण मान्य करता पण आम्ही जनतेने झोपड्या बांधू नयेत का याचा पहिल्यांदा अभ्यास व्हावा व गोरगरीबांना न्याय द्यावा. याची माझ्याकडे कागदपत्रे आहेत व हे मी सिध्द करुन दाखवतो. कोर्टाची बिल्डींग अनधिकृत आहे.

**प्र. २२. श्रीमती सना नाझरी, सरपंच, जयगड.**

सीआरझेड बाबतचा जो शासन निर्णय झालेला आहे त्याबाबतचे पत्र आम्हांस शासनाकडून मिळाले नाही. याबाबत आम्ही आपल्याकडे तक्रार नोंदवली आहे. आज आमच्याकडे दोन तीन कंपन्या आलेल्या आहेत व समुद्रामध्ये काम करत आहेत व बिल्डींग बांधलेली आहे. मी तुम्हाला १५ ते २० दिवसापुर्वी पत्र दिलेले आहे की, गणपती विसर्जन कोठे करायचे. आमचे घरात पाणी आलेले आहे. आम्ही लेखी निवेदन दिलेले आहे. कंपन्या जिथे पाहिजे तेथे जाऊन काम करतात. आम्ही कुठे जायचे.

**प्र. २३. स्वतःचे नांव न सांगता प्रश्न उपस्थित केला.**

रत्नागिरीमध्ये मासे व आंबा असे दोन व्यवसाय आहेत. टाऊन प्लॅनिंग स्कीमप्रमाणे १२.१२.१९७४ आणि २७.०४.२००० प्रमाणे पेठकिल्ला येथे फिश नोटीफाईड इंडस्ट्रीअल झोन केलेला आहे व तो झोन पूर्णपणे सीआरझेड मध्ये आहे व सीआरझेडप्रमाणे तो प्रोहीबीटेड झोन आहे. नवीन लोकांनी तेथे जागा घेतलेल्या आहेत. त्यांना २०१८ चे सीआरझेड नियम लागू होतील का.



Scanned with CamScanner

**प्र. २४. श्री. दिपक विचारे, दापोली, जि. रत्नागिरी.**

मला मॅग्रुव्ह डेव्हलपमेंट इन द पेरिफेरीज बाबत बोलायचे आहे. येथील लोक पारंपारीक शेती करत आहेत आणि खाडी व समुद्राच्या बाजुला दिवसेंदिवस मँग्रुव्हचे अतिक्रमण होत आहे व त्याची कोठेही नोंद केलेली नाही. त्याला इको सेन्सीटीव्ह झोन असे मानण्यात आले आहे. त्यामुळे पेरिफरीमध्ये शेती करणे अवघड झालेले आहे. त्यामुळे नोटीफिकेशनमध्ये पेरिफेरी व मॅनग्रोव्ह यांचे डिमार्केशन व्हावे.

**प्र. २५. श्री. देवानंद धुळुबुळु, आंबोळगड, राजापूर,**

आंबोळगड गावची नैसर्गीक परिस्थिती अशी आहे की, पश्चिम भाग हा समुद्रात गेलेला आहे आणि पूर्ण आडवा डोंगर तयार झालेला आहे त्याच्या मागील बाजूस गाव आणि बिचेस आहेत त्यामुळे त्या समंद्राच्या लाटा डोंगरावर व दगडावर आपटतात व त्या मागच्या बाजूस येत नाहीत त्यामुळे तो मागचा संपूर्ण समुद्र किनारा सुरक्षीत आहे. असे असताना हे बीच सीआरझेड-३ ब मध्ये येते. आंबोळगड हे गाव पर्यटन क्षेत्र वर्ग क मध्ये आहे. त्याच्यामध्ये गगनगिरी महराजांचे मठ आहे, लोकसंख्याबाबत बोलायचे झाले तर येथील लोकसंख्या कमी नव्हती तर लोक व्यवसायासाठी मुंबईला गेलेले आहेत त्यामुळे येथील लोकसंख्या कमी आहे. येथे व्यवसाय सुरु करावेत म्हणजे बाहेर गेलेले लोक परत येतील. मला एवढेत म्हणायचे आहे की, तो पर्यटन क्षेत्रासाठी सुरक्षीत समुद्र किनारा आहे. तो समुद्र किनारा सुरक्षीत नाही हे आपण दाखवलेले आहे. आपण २०० मिटरची अट कमी करावी, १० मिटर करावी. नकाशा बघीतल्यावर हे लक्षात येईल. दुसरे म्हणजे गावाच्या उत्तरेला जी धोका रेषा दाखविलेली आहे ती चुकीची दाखवलेली आहे. जी ठिकाणी आहे टक्केवारीमध्ये दाखवले आहे ते मॅपमध्ये दाखवले आहे काय. कासवांची प्रजनन ठिकाण दाखविले आहे काय, समुद्रामध्ये कोरलचे एक ठिकाण आहे.

**प्र. २६. श्री. मंगेश चव्हाण, जुवे रत्नागिरी**

भाटये खाडी मध्ये जुवे बेट तेथील मी रहिवाशी आहे. मी माझे निवेदन सादर केले आहे. ज्या शिटमध्ये भाटये खाडीचा सीआरझेड प्रस्तावित केलेला आहे त्यामध्ये सड्यावर कोणतीही



Scanned with CamScanner

मनुष्यवस्ती नाही हे दाखविले आहे, मनुष्यवस्ती बेटावर आहे त्याचे मार्कींग असायला हवे होते. सीआरझेड मध्ये जो जुव्याचा भाग आहे त्याचे मार्कींग असले पाहिजे. सीआरझेड नोटीफिकेशनचे कलम १०.२ जे बॅक वॉटर आहे त्याच्यासाठी हाय टाईड पासून २० मिटरचे सीआरझेड मार्कींग आहे. परंपरेने हे बेटच आहे याची प्रशासनाने नोंद घेणे गरजेचे आहे. जुवे बेटाच्या चारही बाजुंनी हाय टाईड लाईन दाखवलेली आहे त्यामध्ये दुरुस्ती होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सीआरझेड नोटीफिकेशनप्रमाणे जो ५० मिटर ना विकास क्षेत्र पट्टा दाखवलेला आहे तो २० मिटरवर करण्यात यावा. सड्यावरचे नाव काढून जुवे बेटावरचे मार्कींग करण्यात यावे. जे बायोलॉजिकल ॲक्टीव आहे ज्या ठिकाणी कांदळवन हे नैसर्गिक आपोआप ऊगवतात, अनेक प्रकारचे पारंपारीक मासे, खेकडे त्या ठिकाणी रहीवास करतात, हजारो मच्छीमारांची उपजिवीका आहे. भाटयेच्या खाडीमध्येसुध्दा एक जुवे व जैतापुरमध्ये सुध्दा एक जुवे बेट आहे त्यांचेसुध्दा सीआरझेड २० मिटरच्या मार्कींगमध्ये यायला हवे.

भाटये खाडी परिसरामध्ये वनक्षेत्र फार शिल्लक राहिलेले नाही, हापूस आंब्याचे क्षेत्र आहे येथे बर्ड **नेस्टींग** आहे. भाटये खाडीमध्ये सर्वात मोठे मॅग्रुव्ह आहे त्याची नोंद घ्यावी. काही ओमिशन व चुका झालेल्या आहेत. शेवटच्या पानावर जो नकाशा जोडलेला आहे तो ॲड. तुषार नार्वेकर यांनी मगाशी रेफर केलेला. तीकडे कर्ला आणि जुव्याचा ६०० मिटर बंधारा जो १९७० मध्ये बांधलेला बंधारा आहे तो हाय टाईड लाईन म्हणून दाखवला आहे तो चुकीचा आहे. त्याच्यामध्ये दुरुस्ती व्हावी. सड्याकडे जो रस्ता जातो तेथील बंधारा हाय टाईड लाईन म्हणून दाखविलेली आहे. ती दुरुस्ती व्हावी. तसेच आंबेशेत ला जाणारा जो बंधारा आहे तो सुध्दा हाय टाईड लाईन म्हणून दाखविलेली आहे. ती दुरुस्ती व्हावी. त्याचे गेटही नमूद नाहीत ते नमूद करावे. जुवे गावाचे कनेक्शन आमच्या पुर्वेकडे जो सडा आहे त्या दोन बंधा-याच्या स्वरुपात होते त्याची नोंद दिसत नाही तेही मी मार्क करुन दिलेले आहे. आमच्या असे निदर्शनास येते की ब-याच ठिकाणी लो टाईड लाईन ही हाय टाईड लाईनच्या आत दाखवलेली आहे. ते बाहेर हवे व ते पाहून घ्यायला हवे. कर्ला व जुवे मधील Mud Flats IA मध्ये दाखविणेत यावेत. १९९१ पासून २०१९ पर्यंत सीआरझेडच्या प्रवासामध्ये कोणतीही ग्रामपंचायत किंवा ग्रामसेवक किंवा तलाठी निश्चितपणे सांगू शकत नाही की हा भाग कुठल्या सीआरझेडमध्ये येतो. त्यामुळे जनजागृती होणे गरजेचे आहे. सीआरझेड बाबत तलाठी, ग्रामसेवक इ. यांचे अवेअरनेस कॅंप घ्यावेत. तसेच सस्टेनेबल आणि इकॉलॉजीकली सेफ टूरिजमचा उल्लेख सीआरझेड



Scanned with CamScanner

च्या नोटीफिकेशनमध्ये आलेला आहे. फॉरेस्ट डिपार्टमेंटने अनेक गावामध्ये मँग्रुव्हसाठी सहकारी संस्था निर्माण केलेल्या आहेत त्या गावांमध्ये सस्टेनेबल टूरिजम *या* प्रस्तावित अॅक्टीवीटीसाठी प्लॅन होणे गरजेचे आहे. सर्वात महत्वाचे अॅप्राप्रिऐट कन्सलटेशन म्हटलेले आहे ते तेव्हाच होईल जेंव्हा स्थानिक भाषेमध्ये ते होईल. जिल्हाधिकारी यांनी आमच्या समस्यांकडे लक्ष द्यावे. सीआरझेडमध्ये संपूर्ण जिल्हा येतो पण जनसुनावणीस फक्त चारच सरपंच, पंचायत समितीचे एकच सदस्य व एक माजी आमदार उपस्थित आहेत. या सर्वांमध्ये कन्सलटेशन होऊन एकमत होईल व त्यातून अंतिम सूचना करता येईल व सीआरझेड अंतिम होईल. हे सर्व लोकाभिमुख होईल.

**प्र. २७. प्रदीप साळवी, माजी सरपंच, जयगड.**

जयगड किल्ला मॅपमध्ये दाखविलेला नाही, तेथे बहुसंख्य मच्छिमार आहेत ते दाखविलेले नाही. बांधकामासाठी परवानगी मिळावी व एफ.एस.आय. वाढवून मिळावा.

यानंतर मा. अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणी संपल्याचे घोषीत केले.

**(लक्ष्मीनारायण मिश्रा)**
**अध्यक्ष तथा**
**जिल्हा दंडाधिकारी रत्नागिरी**

**प्रत:-.........................सर्व संबंधितांना माहितीकरिता**

**(इंदिरा ता. गायकवाड)**
**समन्वयक तथा**
**उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, रत्नागिरी**



Scanned with CamScanner